# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:13.06.2025** **वार:शुक्रवार**

---

1. विमान दुर्घटना अन्वेषण विभागाकडून अहमदाबाद विमान दुर्घटनेची चौकशी सुरू
2. विमान दुर्घटनेतील मृतांची ओळख पटवण्यासाठी डीएनए नमुने तपासणार
3. अहमदाबाद विमान दुर्घटनेबद्दल देशभरातून शोक व्यक्त, मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी 1 कोटी रुपयांची मदत देण्याचा टाटा समूहाचा निर्णय आणि
4. राज्याच्या विविध भागात आज मेघगर्जनेसह जोरदार पावसाचा इशारा

**विमान दुर्घटना**

गुजरातमध्ये अहमदाबाद इथं काल दुपारी एअर इंडियाचं एआय-171 हे प्रवासी विमान रहिवासी भागात कोसळलं; विमान दुर्घटना अन्वेषण विभागानं या दुर्घटनेची चौकशी सुरू केली आहे. आंतरराष्ट्रीय नागरी विमान संघटनेनं ठरवलेल्या प्रक्रियेनुसार ही चौकशी केली जाईल, असं नागरी विमान वाहतूक मंत्री राम मोहन नायडू यांनी सांगितलं. या विमानात प्रवासी आणि कर्मचारी मिळून 242 जण होते. त्यामध्ये 169 भारतीय नागरिक, 53 ब्रिटिश नागरिक, पोर्तुगालचे 7 नागरिक आणि कॅनडाच्या एका नागरिकाचा समावेश होता. या अपघातात विमानंतल्या 241 लोकांचा मृत्यू झाला असल्याचं एयर इंडियानं सांगितलं. अपघातात मृत्यूमुखी पडलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या कुटुंबाला एक कोटी रुपयांची मदत टाटा समूहाचे अध्यक्ष एन चंद्रशेखरन यांनी जाहीर केली आहे. त्याचप्रमाणे जखमींचा संपूर्ण वैद्यकीय खर्च टाटा समूह करणार आहे. गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी यांचाही मृतांमध्ये समावेश आहे. तसंच अपर्णा महाडीक, दीपक पाठक, मैथिली पाटील या महाराष्ट्रातल्या नागरिकांचाही मृतांमध्ये समावेश आहे. दीवमध्ये राहणारा एक प्रवासी या दुर्घटनेतून वाचला आहे.

दरम्यान केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी काल संध्याकाळी दुर्घटना स्थळाला भेट दिली; तसंच नागरी विमान वाहतूक मंत्री के राममोहन नायडू आणि गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासमवेत बैठक घेऊन मदत आणि बचाव कार्याचा आढावा घेतला. त्यानंतर माध्यमांशी बोलताना अमित शहा म्हणाले....

**घटना से पूरा देश शुद्ध है और पूरा देश एक साथ पूर्ण संवेदनाओं के साथ ये जो दुर्भाग्यपूर्ण हादसे में पैसेंजर हताहत हुए हैं इनके परिजनों के साथ खड़ा है। एक यात्री का बचने का अच्छा समाचार मिला है। मैं उनको मिलकर आया हूँ मृत्यु। आंकड़ा तो डीएनए परीक्षण और यात्रियों की पहचान के बाद ही अथॉरिटी अधिकृत रूप से घोषित करेगी। एविएशन डिपार्टमेंट ने अपनी जाँच शुरू कर दी है और जांच तेजी से आगे बढ़े इसके लिए भी एविएशन मंत्री जी ने सूचनाएं दी है।**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती जगदीप धनखड, पंतप्रधान नरेंद्र मोदी, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे तसंच नागरी विमान वाहतूक राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी या घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे. लोकसभेतील विरोधी पक्ष नेते राहुल गांधी यांनीही या अपघाताबद्दल शोक व्यक्त केला आहे. या दुर्घटनेमुळं कॉंग्रेसनं राज्यभरात आयोजित केलेले मशाल मोर्चे पुढचे 2 दिवस स्थगित केले आहेत. अपघाताच्या सर्व तपशीलांबाबत समन्वयासाठी मंत्रालयात एक नियंत्रण कक्ष कार्यरत करण्यात आल्याची माहिती नागरी विमान वाहतूक मंत्रालयानं दिली आहे. नागरिकांच्या मदतीसाठी हवाई वाहतूक मंत्रालय, एअर इंडिया, गुजरात सरकार यांनी हेल्पलाइन क्रमांक जाहीर केले आहेत. नागरिकांना 079-232-51900, 9978405304, 011-24610843 आणि 9650391859 या क्रमांकावर संपर्क साधता येईल.

**रेल्वे-मुंबई**

गुजरातमधील विमान अपघात दुर्घटनेमुळे प्रवासी आणि त्यांच्या नातेवाईकांच्या प्रवासाच्या सोयीसाठी भारतीय रेल्वे अहमदाबाद - मुंबई आणि अहमदाबाद-नवी दिल्ली अशी विशेष रेल्वे चालविणार आहे. दरम्यान, 12 ते 14 जून दरम्यानच्या प्रवासाची तारिख बदलायची असेल किंवा तिकीट रद्द करायचं असेल तर कुठलंही शुल्क न आकारण्याचा निर्णय एअर इंडियानं जाहीर केला आहे.

**सीतरामन**

डीबीटी व्यवहार म्हणजेच थेट लाभ हस्तांतरण विषयीच्या व्यवहारांमध्ये गेल्या दशकात नव्वद पटीनं वाढ झाल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. 2014 मध्ये 7 हजार कोटीहून अधिक असलेली या व्यवहारांची संख्या गेल्या आर्थिक वर्षात 6 लाख कोटीहून अधिक झाल्याचं अर्थमंत्र्यांनी आपल्या समाज माध्यमवरच्या संदेशात म्हटलं आहे.

**यूपीआय**

दरम्यान, यूपीआयद्वारे केल्या जाणाऱ्या व्यवहारांसाठी विक्रेत्यांना सवलत देण्यात येणार असल्याचे दावे पूर्णपणे खोटे असल्याचं केंद्रीय अर्थ मंत्रालयानं स्पष्ट केलं आहे. यूपीआय द्वारे केल्या जाणाऱ्या व्यवहारांना सरकार कायम प्रोत्साहन देत राहील, असंही मंत्रालयानं म्हटलं आहे.

**योगदिन**

यंदा 21 जून रोजी सकाळी होणाऱ्या आंतरराष्ट्रीय योग दिन सोहळ्यात देशभरात एक लाखाहून अधिक योगविषयक कार्यक्रम एकाच वेळी आयोजित केले जाणार असल्याचं केंद्रीय आयुष राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी सांगितलं. ते काल नवी दिल्ली इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. यंदाची योग दिनाची संकल्पना 'एक पृथ्वी-एक स्वास्थ्यासाठी योग' अशी आहे. यंदाचा मुख्य कार्यक्रम आंध्र प्रदेशात विशाखापट्टणम इथं होणार असून या कार्यक्रमात पंतप्रधान नरेंद्र मोदी सहभागी होणार आहेत. त्यांच्यासह सुमारे 40 देशांचे प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होतील, अशी महितीही जाधव यांनी दिली.

**अभियान-परभणी**

शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी केंद्र सरकारतर्फे राबवण्यात येत असलेल्या विकसित कृषी संकल्प अभियानाचा काल समारोप झाला. परभणी कृषी विज्ञान केंद्र, कृषी विभाग आणि वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठाच्या वतीने पूर्णा तालुक्यात कातनेश्वर इथंही समारोप कार्यक्रम झाला. यावेळी खरीप पेरणीच्या अनुषंगानं नवीन विकसित झालेलं पिकांचं वाण आणि तंत्रज्ञान याविषयी शेतकऱ्यांना माहिती देण्यात आली, असं कृषि विद्यापीठाचे संशोधन संचालक डॉ.खिजर बेग यांनी सांगितलं. ते म्हणाले....

**पंधरा दिवसामध्ये कृषी विज्ञान केंद्र कृषी विद्यापीठ आणि केव्हीके आणि आपले जे आयसीआर चे केंद्र आहे त्यांची संयुक्त मोहीम आपण संपूर्ण मराठवाडा महाराष्ट्र आणि भारतामध्ये राबवलेली आहे. आणि मागच्या पंधरा दिवसात केव्हीके परभणी आणि विद्यापीठाने संयुक्तरित्याची मोहीम ते नव्वद गावापर्यंत आम्ही पोहोचलेलो आहोत. आणि याचा मुख्य उद्देश होता की उत्पादन खर्चात कमी करणे आणि उत्पादकता वाढणे याशिवाय आपले जे काही नवीन तंत्रज्ञान आहे. नवीन वाण आहे त्याची माहिती हंगामाच्या अगोदर शेतकऱ्यांना व्हावी त्यासाठी आपली जी मोहीम राबवली गेलेली आहे आणि मला वाटतं हे फार सक्सेसफुल झालेली आहे.**

**सायबर संरक्षण–नवीमुंबई**

वित्तीय संस्थांवरील सायबर हल्ल्यांचं वाढलेलं प्रमाण पाहता राज्य सहकारी बँकेनं सायबर सिक्युरिटी ऑपरेशन सेंटरची उभारणी केली आहे. वाशी इथं उभारण्यात आलेल्या या केंद्राचं उद्घाटन आज, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते होणार आहे. बँकेचे अध्यक्ष विद्याधर अनासकर यांनी काल याबाबत माहिती दिली. ते म्हणाले.....

**महाराष्ट्र राज्य सहकारी बँकेने सायबर सिक्युरिटी ऑपरेशन सेंटर सुरु केलेलं आहे त्याचा फायदा महाराष्ट्रातील सर्व सहकारी बँकांना देण्याचं आमचं धोरण आहे त्यामध्ये सगळ्या जिल्हा सहकारी बँक आहेत. चारशे शहात्तर नागरी सहकारी बँक आहेत या सगळ्या लोकांना आम्ही फॅसिलिटी देऊ गेलेली आहे आता आमची कॅपॅसिटी पन्नास बँकांना ऑनबोर्ड करून घेण्याचं आमचं इन्फ्रास्ट्रक्चर आहे आता आमच्याकडे दोन बँका नागरी सगळ्या बँका नाही जिल्हा बँका दोन बँका ऑलरेडी ऑनलाईन आहेत आणि याच्यानंतर आमचं पहिलं टार्गेट असं राहील की महाराष्ट्रातल्या सगळ्या एकतीस जिल्हा बँका या ऑनबोर्ड झाल्याच पाहिजेत आणि त्याच्यानंतर जशी आमची कॅपॅसिटी वाढवू जशी रिक्वायरमेंट असेल आम्ही नागरी सहकारी बँकांना पण फॅसिलिटी उपलब्ध करून देऊ.**

**मुख्यमंत्री**

राज्याचे विकासचक्र वेगवान करण्यासाठी सिंचन प्रकल्प आणि उदंचन जलविद्युत प्रकल्पांची कामे कालबध्दरित्या पूर्ण करावीत, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल एका बैठकीत दिले. राज्याची सिंचन क्षमता वाढवण्यासाठी राज्यातील 381 सिंचन प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे.

**क्रिकेट**

जागतिक क्रिकेट कसोटी स्पर्धेच्या विजेतेपदासाठी लंडनमध्ये सुरू असलेल्या सामन्यात, काल दुसऱ्या दिवशी दक्षिण आफ्रिकेचा पहिला डाव 138 धावांवर आटोपला, ऑस्ट्रेलियाला 74 धावांची आघाडी मिळाली आहे.

**ढगफुटी**

सांगली आणि कोल्हापूरमध्ये काल संध्याकाळी जोरदार पाऊस झाला. कोल्हापूरमध्ये सरनोबतवाडी ते मणेरमाळ दरम्यानच्या ओढ्यात शाळकरी मुलगा वाहून गेला. पुण्यातही काल रात्री मेघगर्जनेसह जोरदार पाऊस झाला. सिंधुदुर्ग जिल्हयात काल दुपारपासून पावसानं पुन्हा जोर धरला आहे. जळगाव शहर आणि जिल्ह्यात काल मुसळधार पावसानं झोडपून काढलं.

**हवामान**

येत्या 24 तासात कोकण किनारपट्टीवर तुरळक ठिकाणी सोसाट्याच्या वाऱ्यासह अतिजोरदार पावसाची तर मध्य महाराष्ट्र, विदर्भ आणि मराठवाड्यात तुरळक ठिकाणी सोसाट्याचा वारा आणि विजांसह जोरदार पावसाची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.